316

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संदीप वसंत खळे
मु.देवगांव, पो.पिंपरखेड,
ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
ता.आंबेगाव

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषि अधिकारी,**
ता.आंबेगांव, घोडेगाव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१५/२००९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०५/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/०६/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मंडल कृषि अधिकारी, घोडेगांव या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्यासाठी खर्च झालेल्या निधीबाबतची माहिती | |

## विवेचन

'माझ्या माहिती-मागणी अर्जाप्रमाणे मला माहिती प्राप्त झाली असून सदर माहितीमुळे माझे पूर्णतः समाधान झाले आहे. त्यामुळे माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. माझे आयोगाकडील अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री. संदीप वसंत खळे यांनी दि.२०/०३/२०१० व २५/०३/२०१० च्या निवेदनाद्वारे आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भिमराव लक्ष्मण पवार
रा.आंधळगाव, ता.मंगळवेढा, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,**
पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२१/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/०६/२००९ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री. भिमराव लक्ष्मण पवार<br>रा.आंधळगाव, ता.मंगळवेढा,<br>जि.सोलापूर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,**<br>पंढरपूर, जि.सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.यु.के.कांबळे<br>**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**<br>मंगळवेढा, जि.सोलापूर<br>श्री.एस.सी.गस्ते | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/१०/२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/०१/२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/०४/२००८ |

| | |
|---|---|
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे आंधळगाव, ता.मंगळवेढा या गावासाठी राबविलेल्या सर्व कृषिविस्तार योजनांची माहिती, मूळ पावत्यांसह मंजूर रक्कम व खर्च, लाभार्थी यादी, आंधळगाव पॉकेटमध्ये सुरु असलेली कामे, त्यामधील पूर्ण झालेली कामे, अपूर्ण कामे, मंजूर निधी, एम.बी.ची छायाप्रत इत्यादी विकास कामाची माहिती |

## विवेचन

### वाचाः- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.९/०२/२०१०

श्री. भिमराव लक्ष्मण पवार यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि. ९/०२/२०१० आदेशामधील अ.क्र.२ येथे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा, श्री. एस.सी.गस्ते यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात आलेली आहे.

तथापि अपीलकर्ता श्री. पवार यांच्या माहितीच्या अर्जाच्या कालावधीत आपण जन माहिती अधिकारी नव्हतो, असे श्री. एस.सी.गस्ते यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. सदर कालावधीत असणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यांची यादी दि.५/०३/२०१० रोजीच्या निवेदनाद्वारे आयोगास अवगत करुन शास्ती रद्द करण्याची विनंती श्री. एस.सी.गस्ते यांनी केली आहे. श्री.गस्ते यांच्या निवेदना सोबत सादर केलेली पूरक कागदपत्रे व कार्यकालावधीचा तपशील विचारात घेऊन श्री. एस.सी.गस्ते, तालुका कृषि अधिकारी यांची शास्ती रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

## सुधारित आदेश

आयोगाच्या दि.९/०२/२०१० रोजीच्या आदेशात पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१) सदर आदेशातील अ.क्र.२ मध्ये जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा श्री. एस.सी.गस्ते यांना लावण्यात आलेली शास्ती रु.२५०००/- रद्द करण्यात येत आहे.

२) तालुका कृषि अधिकारी, मंगळवेढा कार्यालयाने दि.२७/०४/२०१० रोजी सादर केलेल्या कार्यकालावधीच्या तपशिलानुसार श्री. ए.एन.चव्हाण, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती देण्याबाबत कार्यवाही केली नसल्याने त्यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे.

३) सदरची शास्तीची रक्कम श्री. चव्हाण यांच्या जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०१० म... असणाऱ्या जून, जुलै व ऑगस्ट २०१० च्या वेतनातून तीन समान हप्त्यात वसूल करुन ती ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर, जि.सोलापूर यांनी करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे.

दि :- 28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आ.स.जाधव
३९, शनिवार पेठ,
एस.टी.स्टॅण्ड समोर,
कराड, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
नगररचना, सेंट्रल बिल्डींग, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
नगररचना, सेंट्रल बिल्डींग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३०/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/०१/२०१० |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/०१/२०१० |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि. ७/१०/२००९ रोजी श्री. लांडगे, संचालक, नगररचना यांनी काढलेल्या उद्‌गाराबाबत शासन निर्णय/परिपत्रक/अधिकार पत्रांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.आ.स.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन दि. ७/१०/२००९ रोजी श्री. लांडगे, संचालक, नगररचना यांनी काढलेल्या उद्‌गाराबाबत शासन निर्णय/परिपत्रक/अधिकार पत्रांच्या छायाप्रतींची मागणी केलेली आहे. तथापि

'संबंधितांमध्ये झालेले संभाषण हा अभिलेखाचा भाग होत नाही. त्यामुळे सदर माहिती देण्यास जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, यांनी दाखविलेली असमर्थता संयुक्तिक आहे; हा अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, यांनी दि.८/०२/२०१० रोजी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विनोदभाई जयंतीलाल भुवा
नितीन एजन्सी, गुजराती हायस्कूल शेजारी,
वखारभाग, महावीरनगर,
सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
श्री गुजराती सेवा समाज,
२५०, वखारभाग, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
श्री गुजराती सेवा समाज,
२५०, वखारभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि. १३/०९/२००७ ते ७/०३/२००८ अखेर न्यासाच्या प्रलंबीत कामांची पूर्तता झाली किंवा नाही, याबाबतची माहिती | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. विनोदभाई जयंतीलाल भुवा यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती रेखा बापू वाघमारे
रा.मंगळवार पेठ, माळी गल्ली,
सुतारवाडा, मिरज-४१६ ४१० अपीलकर्त्या

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्था)
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्था)<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली<br>श्री. जयंत विश्वनाथ नाईक | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पतीने सहकारी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात अपीलकर्त्या श्रीमती रेखा बापू वाघमारे यांनी माहिती मागितली होती. सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. तथापि मिरज नगर परिषद सेवकांची पतसंस्था मर्या., मिरज या पतसंस्थेकडून माहिती मागवून घेऊन श्रीमती रेखा बापू वाघमारे यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (आस्था) सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. जयंत विश्वनाथ नाईक यांनी पूरक कागदपत्रांसह केले. श्रीमती वाघमारे यांच्या अपील क्रं. ८०३/सांगली मध्ये पूर्वी याच संदर्भात आयोगाने दि. ८.४.२००९ रोजी निर्णय दिला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. परशराम वसंत काळे
मु.पो.मोहित्यांचे वडगांव,
ता.कडेगांव, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक,**
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी,**
विटा विभाग, विटा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४१/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/०९/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०९/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/११/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.१५/०८/२००८ रोजी चिंचणी (वांगी), ता.कडेगांव पोलिस स्टेशन मध्ये अपीलकर्त्याने दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती | |

विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१८/०३/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्र व या अपिलासोबतची कागदपत्रे पाहता अपीलकर्ता श्री.परशराम वसंत काळे यांना माहिती दिल्याचे दिसून येते. आपण केलेल्या मूळ तक्रारीवरील कार्यवाही चुकीची असल्याचे व त्यामुळे माहिती चुकीची

असल्याचे श्री.काळे यांचे प्रतिपादन आहे. तसेच सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी प्रपत्रात नमूद केली आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुरेश माणिक मोरे
रा.सरडे, ता.फलटण,
जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक (३),**
सहकारी संस्था, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि.,
फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४४/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/०२/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** केंद्र सरकारच्या कर्ज माफीच्या आदेशानुसार कर्ज माफी दिलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांची यादी | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब अपीलकर्ता श्री. मोरे यांनी आयोगाकडे केलेले सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम;२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. देविदास सखाराम गोडगे
मु.पो.शेळगांव, ता.बार्शी,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (परिचालन),**
बँक ऑफ इंडिया, मुख्य कार्यलय, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

**२) अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती बार्शी, जि.सोलापूर
**३) अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा कृषी अधिकारी,**
जिल्हा परिषद सोलापूर
**४) अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,**
सोलापूर

उत्तरवादी

**१) जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी बँक ऑफ इंडिया,**
शेळगांव, ता.बार्शी जि.सोलापूर
**२) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,**
श्री महादेव मंदिर जीर्णध्दार समिती,
ता.शेळगाव, जि.सोलापूर
**३) जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक,**
पंचायत समिती बार्शी, जि.सोलापूर
**४) जन माहिती अधिकारी तथा तथा जिल्हा कृषी विकास अधिकारी,**
जिल्हा परिषद, सोलापूर
**५) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक राष्ट्रीय केमिकल ॲण्ड फर्टिलायझर्स,**
पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७५/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०८/२००९, २६/०८/२००९, ५/०९/२००९, ९/११/२००९, २७/०८/२००९, |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०९/२००९, ८/१०/२००९, १४/१०/२००९, |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/११/२००९, १३/११/२००९ |
| ५ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रती जोडलेल्या आहेत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. देविदास सखाराम गोडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 MAY 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुरेश शिवराया जमगे
सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, शिरवळ,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. सुरेश शिवराया जमगे<br>सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, शिरवळ,<br>ता.अक्कलकोट, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी<br>श्री. ज्ञानोबा भाऊराव पवार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या अध्यक्षांनी / सचिवांनी खोटी कागदपत्रे तयार करून आपल्या खोट्या सह्या केल्या. एक संचालक बेपत्ता दाखविले, तर हयात असलेल्या दुसऱ्या संचालकांना मयत दाखविले, अशा बेकायदेशीर कारभाराची माहिती आपल्याला दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुरेश शिवराया जमगे यांनी केली.

श्री. जमगे यांनी याच स्वरूपाची माहिती-मागणी व तक्रार करणारे अनेक अर्ज केले असून त्याबाबत त्यांना वारंवार कळविण्यात आले आहे. तसेच संचालकांचा कायदेशीर / बेकायदेशीरपणा ठरविणे आपल्या कक्षेत येत नसल्याचे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी लेखी स्वरूपात कळविल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. श्रीनिवास नरसप्पा मैले
रा. १७७०, दत्तनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी — उत्तरवादी
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसही

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. श्रीनिवास नरसप्पा मैले
रा. १७७०, दत्तनगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी — उत्तरवादी
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीसही

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकर्ता हे कोणत्याही सुनावणीस उपस्थित नसल्याने त्यांना अपील चालविण्यात स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रमेश वसंतराव देशपांडे
२९, श्री. गणेश सहकारी गृह निर्माण मंडळ,
शरद सोसायटी जवळ, जुळे सोलापूर
.. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
सोलापूर, जि. सोलापूर
.. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, जि. सोलापूर श्रीमती यु.डी. जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९७४ ते १९७८ या काळात महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील भूमिहीन बेघर लोकांना घरकुले बांधून देण्याच्या योजनेत समाजकल्याण विभागाच्या मालकीच्या जमिनी घेण्यात आल्या होत्या त्याबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. माहिती आठ दिवसांत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले, तरीही माहिती मिळाली नाही, असे अपीलकर्ता श्री. रमेश वसंतराव देशपांडे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे.

संबंधित माहिती ३० वर्षांपूर्वीची असून ५५ भूखंड दिले, त्यांचे आदेश मिळून येत नाहीत. जुनी माहिती असल्यामुळे शोधून काही माहिती दिली. मुद्दा क्र.२ ची माहिती तहसील कार्यालय, बार्शी यांच्या कक्षेतील असल्यामुळे त्यांना तसे कळविले होते, परंतु अभिलेख कक्षात सदर कागदपत्रांचा आढळ होत नसल्याचे तहसीलदार, बार्शी यांनी कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, सोलापूर श्रीमती यु. डी. जाधव यांनी नमूद केले.

संबंधित आदेशांचा शोध घेऊन तहसीलदार, बार्शी यांनी १० दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १२.३.२०१० च्या पत्रान्वये तहसीलदार, बार्शी यांनी कळविले. संबंधित कागदपत्रे अभिलेख कक्षात आढळ होत नसून सदरच्या कागदपत्रांना वाळवी लागून तुकडे तुकडे झाले असण्याची शक्यता आहे, असा अहवाल निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांनी दि. ४.६.२०१० रोजी सादर केला असल्याचे श्रीमती शेटे यांनी दि. ५.६.२०१० च्या पत्रान्वये अवगत केले. आयोगाने दिलेल्या मुदतीत तहसीलदार, बार्शी यांच्याकडून आदेश प्राप्त करून सादर न करणे ही गंभीर बाब आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी तहसीलदार, बार्शी यांच्याकडून माहितीबाबत अहवाल विहित मुदतीत प्राप्त करून घेऊन सादर न केल्याबद्दल दि. २५.६.२०१० पर्यंत खुलासा आयोगास सादर करावा. त्यानंतर अनुषंगिक कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

पुणे.
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भगवान पांडुरंग धुमाळे
६१, सहयाद्री नगर, माजी सैनिक वसाहती जवळ,
मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल),**
जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७३/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल),**<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली<br>सांगली श्री.नितीन राऊत<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली<br>यांचे प्रतिनिधी श्री.संजीव पलांडे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०८/२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६/०९/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/०२/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३/१०/२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेतील प्रलंबीत व निकाली काढलेल्या आर.टी.एस. दाव्यांची क्रमांकासह माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. भगवान पांडुरंग धुमाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२८/०५/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'महसूल विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची सुनावणी चालू झाली असल्याने व या प्रकरणांचा परिणाम चालू प्रकरणांवर होऊ नये यासाठी मी आयोगाकडे केलेले अपील निकाली काढावे, माझी काही तक्रार नाही,' असे निवेदन अपीलकर्ता श्री. भगवान पांडुरंग धुमाळे यांनी दि. २४/०५/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 29 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाडी रोड,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर,
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाडी रोड, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.वि.रा.बालगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर,
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.जे.पां.दिवेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.९.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अतिक्रमण काढण्याबाबतची उत्तरातील तारीख चुकली असल्याचे नगरपालिकेने कळविले. मात्र आपण केलेल्या दुरूस्ती अर्जातील सत्य माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुनिल प्रभाकर औटे यांनी केली.

अतिक्रमण केलेल्या टपऱ्या काढण्याबाबत दि.२७.१२.२००७ रोजी दौंड नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.औटे यांनी मागितली होती. संबंधित कारवाई दि.२९.१२.२००७ रोजी केली असल्यामुळे तसे कळविले. दि.२९.१२.२००७ रोजी केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी, असा अर्ज श्री.औटे यांनी त्यानंतर केला. त्यावरही मुद्देनिहाय उत्तर दिले. दि.१३.८.२००९ ते दि.१७.२.२०१० या कालावधीत श्री.औटे यांनी याच माहितीबाबत नऊ अर्ज केले आहेत व दि.१.१०.२००९ ते १६.१०.२००९ या कालावधीत तीन अपिले केली आहेत. अतिक्रमणविरोधी कारवाईत त्यांची ही टपरी काढून टाकण्यात आली होती. त्यांच्या सर्व अर्जांवर विहित मुदतीत माहिती व अपिलाचा निर्णय दिला आहे. आणखी महिती हवी असल्यास अभिलेखाचे अवलोकन करावे, असे त्यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.जे.पां.दिवेकर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.वि.रा.बालगुडे यांनी पूरक कागदपत्रांसह

माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. त्याच त्याच माहितीसाठी पुनःपुन्हा अर्ज व अपिले करणे हा सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे

2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सूर्यकांत सिध्देश्वर कुकडे
माधव टॉकीज रोड, लोणार गल्लीजवळ, **अपीलकर्ता**
ता.मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
नगररचना विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८२/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**<br>नगररचना विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली<br>श्री. बबन निवृत्ती बनकर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**<br>सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली<br>श्री.एस.बी.गोसावी | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१२/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७/०१/२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०२/२०१० |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मिरज शहरातील मोबाईल टॉवर व त्यासाठीच्या परवानगीची तपशिलवार माहिती | |

## विवेचन

'प्रथम अपिलातील आदेशानुसार मला अपेक्षित असलेली माहिती मिळाली आहे. त्यामुळे मी आयोगाकडे दाखल केलेले अपील निकाली काढण्यास माझी हरकत नाही, असे अपीलकर्ता श्री. सूर्यकांत सिध्देश्वर कुकडे यांनी दि. २०/०५/२०१० च्या निवेदनाद्वारे (प्राप्त दि.२६/०५/२०१०) आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा-मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश कृष्णांथ कांबळे
४३७८, भवानी पेठ, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक(वाहतूक), , महाराष्ट्र राज्य
परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य
परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश कृष्णांथ कांबळे
४३७८, भवानी पेठ, बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक(वाहतूक), , महाराष्ट्र राज्य
परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई श्री.व्ही.एस.बच्छाव

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य
परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई श्री.एस.डी.माईनहळ्ळीकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

बुकस्टॉल प्रकणात कोणताही दावा न्यायप्रविष्ट नसताना, न्यायप्रविष्ट असल्याची चुकीची माहिती राज्य परिवहन महामंडळाने दिली व दाव्याचा क्रमांकही चुकीचा दिला. जाणीवपूर्वक दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रकाश कृष्णांथ कांबळे यांनी केली.

सन १९६३ ते १९७१ या कालावधीतील बुकस्टॉल परवान्याच्या संदर्भातील हा विषय असून सन १९५७ पासूनचे संदर्भ अपीलकर्त्याने दिले आहेत. राज्य परिवहन स्थानकातील उपहारगृह, पुस्तक केंद्र आदी विषयांची कागदपत्रे पाच वर्षे जतनाची आहेत. त्यामुळे ही कागदपत्रे नष्ट करण्यात आली आहेत. तरीही अपीलकर्त्यास देय माहिती दिलेली आहे. 'बोगस व बेकायदा दावा राज्य परिवहन मंडळाने का लावला,' 'न्यायालयाने थकबाकी फेटाळली असताना कोणत्या कायद्याने थकबाकी काढली,' अशा स्वरूपाची विचारणा श्री.कांबळे यांनी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती 'माहिती' ठरत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई श्री.एस.डी.माईनहळ्ळीकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

दावा क्रमांकाबाबत निश्चिती करून अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयोगाच्या आदेशानुसार दावा क्रमांकाबाबत खात्री करून मूळ

कळविलेला क्रमांकच योग्य असल्याचे दिवाणी न्यायालयातील दाव्याच्या प्रतीसह अपीलकर्त्यास कळविल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई श्री.व्ही.एस.बच्छाव यांनी दि.२६.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. दाव्याचा क्रमांक व न्यायालयाच्या निकालपत्राची प्रत न मिळाल्याची तक्रार श्री.कांबळे यांनी दि.२९.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. ती रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.